| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय**<br>**मिरा-भाईंदर, वसई-विरार**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं. ०२२-२९४५१००१** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**दि ०९/०७/२०२२**

## जून महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) दिनांक ०९/०७/२०२२ रोजी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात मागील महिन्यामध्ये घडलेले गुन्हे व इतर घटनांचा आढावा घेण्यासाठी मा. पोलीस आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली ऑनलाईन मासिक गुन्हे आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीदरम्यान एका महिन्यामध्ये गुन्हयाची उकल करणाऱ्या ३ उत्कृष्ट तपासाचा क्रमांक काढण्यात येवून सदर कामगिरी करणाऱ्या पथकाचा मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार करण्यात येत असतो. त्याअनुषंगाने नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये राहणारे फिर्यादी नामे सतेंद्र अमरपाल सिंग हे त्यांच्या राहते घर- रुम नं. २०१/ए विंग, साई सरोवर, आर एन पी पार्क, भाईंदर पुर्व ता. जि. ठाणे येथील घराला दिनांक ३१/५/२०२२ रोजी दुपारी १३:३० वाजता कुलुप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यानंतर सायंकाळी १९:०० वाजताच्या सुमारास घरी आल्यानंतर त्यांनी बघितले की, त्यांचे घराचे दरवाज्याचा कडीकोयंडा तुटलेला असून घरातील लाकडी कपाटाचे ड्राव्हर तोडून त्यातील ७,९२,०००/- रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम २५०००/- रुपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले आहे. त्याबाबत फिर्यादी श्री सतेंद्र सिंग यांनी नवघर पोलीस ठाणे येथे माहिती दिली असता नवघर पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळाची पाहणी केली. फिर्यादी यांनी कथन केल्याप्रमाणे घरफोडी चोरीचा गुन्हा घडल्याचे दिसून आल्याने फिर्यादी यांची तात्काळ तक्रार नोंदवून I गुरनं ४१६/२०२२ भादंवि कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता.

गुन्हयातील आरोपीतांना अटक करुन गुन्हयात चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा उघडकीस येण्याच्या दृष्टीने श्री अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, श्री शशीकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांनी नवघर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदार यांना सुचना देवून मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरणाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना फिर्यादी यांनी दिलेल्या प्राथमिक माहितीप्रमाणे घटनास्थळाचे बारकाईने निरिक्षण करुन घटनास्थळावर येणाऱ्या सर्व व्यक्तींबाबत गुन्हा घडल्यापासून सलग ५ दिवस अहोरात्र मेहनत घेवून सखोल माहिती काढून संशईतांबाबत तांत्रिक पुराव्यांच्या आधारे माहिती प्राप्त केली. प्राथमिक माहितीच्या आधारे दिनांक ५/६/२०२२ रोजी संशईत नामे अलोककुमार मुन्ना सिंग वय २४ रा. वसई यास अटक करुन त्याचेकडे सदरच्या गुन्हयाबाबत अधिक विचारपुस केली असता त्याचा दुसरा साथीदार सौरभ देवशरण

यादव वय २४ वर्ष हा असल्याचे सांगीतले. मात्र सौदभ यादव हा त्याचे पत्नीच्या गावी हावडा, राज्य पश्चिम बंगाल येथे पळून जाणार असल्याची माहिती प्राप्त झाल्याने सर्व रेल्वेबाबत माहिती घेण्यात आली. त्यानुसार मुंबई-हावडा मेलने आरोपी सौरभ यादव हा पळून जाण्याच्या प्रयत्नात असतांना पोशि शेख नेम-जळगांव पोलीस व पोशि तडवी नेम-नवघर पोलीस ठाणे यांनी त्यास अकोला रेल्वे स्टेशन येथून शिताफिने ताब्यात घेवून त्यास दिनांक ७/७/२०२२ रोजी अटक केली. गुन्हयातील अटक आरोपी नामे अलोककुमार सिंग व सौदभ यादव यांचेकडे पोलीस कोठडीदरम्यान कसोशीने विचारपूस करुन त्यांनी चोरी केलेल्या सोन्या-चांदीचे दागीन्यांपैकी **५,९६,४००/- रुपयांचे मौल्यवान दागिने हस्तगत** करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात नवघर पोलीसांना यश आले होते. अटक आरोपी नामे सौरभ देवशरण यादव याचेवर मुंबई, पुणे व नवी मुंबई येथे १३ गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली होती.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिलींद देसाई, पोनि श्री शशीकांत शिंदे, सपोनि. योगेश काळे, पोउपनि अभिजीत लांडे, पोहवा भुषण पाटील, पोना गणेश जावळे, पोशि नवनाथ घुगे, सुरज घुणावत, ओंकार यादव, विनोद जाधव, अमित तडवी, सर्व नेम. नवघर पोलीस ठाणे व पोशि ७७ ऐनुद्दिन शेख नेम.जळगाव जिल्हा पोलीस यांचा दिनांक ०९/०७/२०२२ रोजी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **'जून महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल'** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.

२) मुंबई अहमदाबाद हायवेवर रात्रीच्यावेळी प्रवाश्यांना रिक्षात बसवून प्रवासादरम्यान रिक्षा निर्जनस्थळी थांबवून प्रवाश्यांकडून पैसे, मोबाईल व सोन्याचा ऐवज जबरीने चोरुन नेण्याबाबतचे गुन्हे वारंवार घडत असल्याने सदर प्रकारच्या गुन्हयांचा प्रतिबंध करुन घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सक्त सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा युनिट-२ च्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी हायवेवर घडणाऱ्या गुन्हयांबाबत अथक परिश्रम घेवून तांत्रीक पुरावे हस्तगत करुन व गुप्त बातमीदार यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे सापळा रचुन संशईत नामे मोहम्मद रिझवान शकिल वय २८, बादशाह रेहमत शेख वय २२, सुमित नवल सिंह वय २९, अखिल अक्रम शेख वय १९ व सनी श्यामसुंदर गुप्ता वय २६ यांना दिनांक ४/६/२०२२ रोजी ताब्यात घेवून त्यांचेकडे विचारपूस केली असता त्यांनी वालीव पोलीस ठाणेकडील दाखल असलेला I गुरनं ५२४/२०२२ भादंवि कलम ३९२, ३४ हा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक केली. आरोपीतांकडे पोलीस कोठडीदरम्यान कसोशीने विचारपूस केली असता त्यांनी १) वालीव पो स्टे कडील I गुरनं ५२४/२०२२ भादंवि कलम ३९२, ३४, २) वालीव पो स्टे कडील I गुरनं ३०१/२०२२ भादंवि कलम ३९२, ३४, ३) वालीव पो स्टे कडील I गुरनं ४१८/२०२२ भादंवि कलम ३९२, ३४, ४) नालासोपारा पो स्टे कडील I गुरनं २३५/२०२२ भादंवि कलम ३९२, ३४, ५) वालीव पो स्टे कडील I गुरनं ३६७/२०२२ भादंवि कलम ३९२, ३४, व ६) मिरारोड पो स्टे कडील I गुरनं २२१/२०२२ भादंवि कलम ३७९ प्रमाणे दाखल असलेले गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद आरोपीतांकडून १ ऑटोरिक्षा, १ सोन्याची तुटलेली चैन व ४ मोबाईल हॅन्डसेट असा ७४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलीस

निरीक्षक श्री. शाहूराज रणवरे, सपोनि. सुहास कांबळे, सपोनि. सागर शिंदे, सहा.पोउपनि. रमेश भोसले, पोहवा मंगेश चव्हाण, संजय नवले, चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, प्रशांत पाटील, पोना प्रशांतकुमार ठाकुर, रमेश आलदर, पोकॉ अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **जून महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.

३) दिनांक- २१/०६/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा.चे सुमारास पेल्हार पोलीस ठाणे हद्दीमध्ये श्री प्रजापती हे बॅगमध्ये ५०,०००/- रुपये घेवुन शानबार नाका येथे रिक्षातुन उतरत असतांना दोन अनोळखी इसमांनी मोटर सायकल वरुन येवुन त्यापैकी मागे बसलेल्या इसमाने त्यांचे बॅगेमधील ५० हजार रुपये जबरीने खेचुन नेण्याचा प्रयत्न करित असतांना प्रजापती यांनी त्यास विरोध केला असता त्यांना जिवेठार मारण्याच्या उद्देश्याने आरोपीताने त्याच्याकडील गावठी कट्टयाने तक्रारदार यांच्यावर गोळीबार करुन जबर दुखापत करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. घडलेल्या घटनेबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ५४२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम- ३०७, ३९८, ३४ सह भारतीय शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम ३, २५, २७ सह महाराष्ट्र पोलीस अधि.३७ (१)(३) /१३५ प्रमाणे दिनांक २१/०६/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळास भेट देवुन तांत्रिक पुरावे हस्तगत करुन आरोपीत यांचेबाबत प्राथमिक माहिती प्राप्त केली. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत यांचा माग काढत एक आरोपी हा जंगलात लपुन बसलेला असतांना त्यास सापळा रचुन शिताफिने ताब्यात घेतले. त्याचेकडुन मिळुन आलेल्या माहितीचे आधारे इतर दोन आरोपीत यांना दिनांक २१/६/२०२२ रोजी २४ तासाच्या आत ताब्यात घेवून अटक केली. सदर गुन्हयात आरोपी नामे १) मो. उवैश ऊर्फ जावेद समीम खान, २) रविंद्र अंकुश निगुडकर, ३) सद्दाम करमहुसेन खान, रा. नवजीवन, वसई पुर्व, मुळ रा. उत्तरप्रदेश यांना अटक करुन त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेला ०१ **गावठी कट्टा, ०३ जिवंत काडतुस, ०२ मोटर सायकल असा एकुण-७५,६००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

सदरची कामगिरी करणाऱ्या श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउप.नि./सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.ना./ प्रताप पाचुंदे, पो.अं/ संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, पोहवा/नामदेव ढोणे नेम.सपोआ कार्यालय, विरार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **जून महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -३** म्हणून मा. पोलीस आयुक्त यांनी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.

---०००---